श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या स्थळास “अ” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र.टीडीएस २०२५/०९/प्र.क्र.१५८/पर्यटन-१,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,**
**दिनांक : १९ मे, २०२६**

<u>वाचा -:</u>
१. गृह विभाग, शासन निर्णय दि.०८/११/१९९६
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडिएस-२०१०/ ८/ प्र.क्र.४६३/ पर्यटन, दिनांक ०४/११/२०१०.
३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.टिडीएस २०१५/ १२/ प्र.क्र.१०६५/ पर्यटन, दि.२२ फेब्रुवारी, २०१६ व शुध्दीपत्रक दि.०८ मार्च, २०१६
४. जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडील बैठक दि.१९.०५.२०२३
५. पर्यटन संचालनालयाचे पत्र क्र.पसं./विकास/दगडूशेठ हलवाई/१/प्र.क्र.७२/ २०२५/३०४३, दि.२९ सप्टेंबर, २०२५

**<u>प्रस्तावना :-</u>**

सन १८९३ साली स्थापित झालेले श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती हे केवळ एक मंदिर नसून पुण्याच्या इतिहास, श्रद्धा, संस्कृती आणि समाजसेवेचे प्रतीक आहे. धार्मिक भक्ती, सामाजिक एकोपा, सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन विकास यांचा सुंदर संगम या स्थळामध्ये दिसून येतो. त्यामुळेच हे मंदिर महाराष्ट्राच्या सर्वात प्रतिष्ठित आणि लोकप्रिय गणेश स्थळांपैकी एक मानले जाते. हे ठिकाण पुणे शहरातील सर्वात प्रसिद्ध, श्रद्धास्थान आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे गणेश मंदिर असे ओळखले जाते. हे मंदिर महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि पर्यटन परंपरेचे प्रतीक बनले आहे.

२. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव चळवळीमध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर हे त्या सार्वजनिक गणेशोत्सव परंपरेचा प्रभावी केंद्रबिंदू ठरले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात समाज एकीकरण आणि राष्ट्रभक्ती जागविण्यात या गणेशोत्सवाची मोठी भूमिका होती.

३. गणेशोत्सव काळात येथे पारंपरिक सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत, कीर्तन, भजन, समाजप्रबोधन कार्यक्रम आणि विविध धार्मिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. हे मंदिर पुण्यातील प्रमुख पर्यटन आकर्षणांपैकी एक आहे. देश-विदेशातील पर्यटक पुणे भेटीदरम्यान येथे दर्शनासाठी येतात. मंदिराचे भव्य स्थापत्य, सुवर्णमंडित मूर्ती, आकर्षक प्रकाशयोजना आणि उत्सवकाळातील सजावट पर्यटकांना विशेष आकर्षित करते. हे मंदिर पुण्यातील महत्वाची ठिकाणे शनिवारवाडा, तुळशीबाग आणि पुण्यातील इतर ऐतिहासिक स्थळांच्या जवळ असल्याने धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन साखळीतील महत्त्वाचा भाग आहे.

४. सदर स्थळाचे पर्यटन विषयक महत्त्व लक्षात घेऊन संदर्भाधीन क्र.३ अन्वये, जिल्हा नियोजन समितीच्या दि.१९.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या “क” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील पर्यटन स्थळांची निवड व त्यांना “अ” वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबत निकष ठरविण्यात आले असून, सदर निकषांची पूर्तता होत असल्याने, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या स्थळास -अ॰ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव पर्यटन संचालनालयामार्फत संदर्भाधीन क्र.५ येथील पत्रान्वये सादर केला होता.

५. त्यानुषंगाने “अ” वर्ग पर्यटन स्थळ दर्जासाठी आवश्यक असलेल्या निकषांची पूर्तता होत असल्यामुळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या स्थळास “अ” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टिडीएस २०१५/१२/प्र.क्र.१०६५/ पर्यटन, दि.२२ फेब्रुवारी, २०१६ व शुध्दीपत्रक दि.०८ मार्च, २०१६ अन्वये राज्यातील “अ” वर्ग पर्यटन स्थळ घोषित करण्यासाठी विहित निकष व कार्यपध्दतीस अनुसरुन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, पुणे या स्थळास “अ” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१९१२३४२४०३२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.05.19 12:35:46 +05'30'

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग) यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग) यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

९. मा. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०.मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
११.मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई
१२.मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई
१३.मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१४.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१५.अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, पुणे
१९.सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०.निवडनस्ती (पर्यटन-१)